19 OCT 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

साहित्य सामाजिक एकतेचा संदेश देते

लेखिका मधु कांकरिया : शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे ११ वे अधिवेशन उत्साहात

जनप्रवास : गडहिंग्लज

साहित्य हे समाजातील विविध घटकांना जोडून सामाजिक एकता, समता आणि बंधुभावाचा संदेश देते, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका मधु कांकरिया यांनी केले. विद्या प्रसारक मंडळ संचलित डॉ. घाळी कॉलेजचे हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी साहित्य में चित्रित किन्नर समुदाय : परंपरा, वर्तमान और भविष्य' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे ११ वे अधिवेशनही उत्साहात पार पडले.

या संगोष्ठीचे प्रमुख उद्घाटक लेखिका मधु कांकरिया यांनी बीजभाषणातून हिंदी साहित्यातील किन्नर समुदायाचे चित्रण, त्यांची सामाजिक स्थिती, परंपरा, वर्तमानातील आव्हाने आणि भविष्यातील प्रश्न यांवर सविस्तर प्रकाश टाकला. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजातील विविध घटकांच्या भावना, संघर्ष आणि वास्तव प्रभावीपणे मांडणारे माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. किन्नर समुदायाला समाजात समानतेची आणि सन्मानाची वागणूक मिळण्यासाठी सामाजिक संवेदनशीलता वाढविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संगोष्ठी मार्गदर्शक डॉ. दत्ता पाटील यांनी संगोष्ठी नियोजनामागील भूमिका स्पष्ट केली तसेच महाविद्यालयाची विविध माहिती देऊन सदर संगोष्ठीला शुभेच्छा दिल्या. यावेळी वि. प्र. मंडळचे अध्यक्ष डॉ.सतीश घाळी तसेच डॉ. सुनील बनसोडे, प्रा. डॉ. साताप्पा सावंत यांचेही भाषण झाले.

कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलाने झाली. यावेळी शोधछात्र रतन गुरव हिने स्वागतगीत गाईले. या कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनील बनसोडे, सचिव प्रा. डॉ. नाजिम शेख, प्रा. डॉ. साताप्पा चव्हाण आणि विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, सचिव ॲड. बाबुराव भोसकी, सहसचिव सीए गजेंद्र बंदी, संचालक ॲड. विकास पाटील आणि महेश घाळी यांची उपस्थिती होती. विशाल पिंजाणी यांचीही या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. त्यांनी आपल्या मनोगतात किन्नरांचे समाजातील स्थान, संविधान, कायदे, समस्या आणि त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी पंजाबचे करण सिंहही उपस्थित होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी तर सदर संगोष्ठी बाबतची माहिती हिंदी विभागप्रमुख व संगोष्ठीच्या संयोजिका डॉ. सरोज बिडकर यांनी दिली. मान्यवरांचा परिचय डॉ. एन. बी. एकीले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजीवनी पाटील यांनी तर आभार सदर संगोष्ठीचे सहसंयोजक डॉ. दयानंद पाटील यांनी मानले. या राष्ट्रीय संगोष्ठीमुळे हिंदीतील किन्नर साहित्याची भूमिका, किन्नर समुदायाचे प्रश्न आणि सामाजिकरण समावेशकतेचे महत्त्व यावर विचारमंथन करण्याची संधी उपलब्ध झाली. साहित्याच्या माध्यमातून वंचित घटकांचे प्रश्न समाजासमोर मांडण्याबरोबरच सामाजिक समता आणि एकतेचा विचार अधिक व्यापक करण्याचा संदेश या संगोष्ठीतून देण्यात आले.

या संगोष्ठीसाठी प्रा.अमित कुलकर्णी, प्रा. महेश वंडकर, प्रा. श्रुतकृती पाटील, प्रा. संकेत बेल्लद, प्रा. अतिग्रे, डॉ. नागेश मासाळ, डॉ. सरला आरबोळे, डॉ. निलेश शेळके, प्रा. सचिन जानवेकर, डॉ. शशिकांत संघराज, डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. अंबाजी कुलकर्णी, प्रा. म्हंकावे, प्रा. संजीवनी कांबळे, प्रा.हुलगबाळी, प्रा. खोराटे, डॉ. शिवानंद मस्ती,प्रा. महेश कदम, प्रा. महेश पाटील, प्रा. पुजारी, हरिभाऊ पन्हाळकर यांनी सहकार्य केले.

१२५ हून अधिक शोध पेपर

यावेळी गोवा, झारखंड, आसाम,कर्नाटक, दिल्ली, केरळ, विशाखापट्टणम, बिहार, महाराष्ट्र, छत्तीसगड येथून एकूण १२५ हून अधिक शोध पेपर आले होते. त्याच्या शोध ग्रंथाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. सदर संगोष्ठीसाठी देशातील विविध राज्यांतील विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक, साहित्य प्रेमी, घाळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 OCT 2026
सकाळ

'एएससी'च्या तिघांना बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक

इचलकरंजी, ता. १८ : शिवाजी विद्यापीठांतर्गत आयोजित आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले. यामध्ये साक्षी जाधवने ६५ किलो वजनीगटात, प्रेमदास शिरतोडेने ६५ किलो वजनीगटात, तर प्रणव पेटकरने ५० किलो वजनीगटात सुवर्णपदक पटकावले.

तिन्ही खेळाडूंची राजस्थान येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, ईश्वरपूर येथे या स्पर्धा झाल्या. या यशाबद्दल प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचा सत्कार केला. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. लेफ्टनंट विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.